जुलै-ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित व्यक्तींना मदत देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय,क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ : शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३ दिनांक २९.८.२०१९

प्रस्तावना:

जुलै-ऑगस्ट,२०१९ या कालावधीत राज्यात विविध जिल्हयात अतिवृष्टी झाल्यामुळे पुरपरिस्थिती उद्भवली आहे. दिनांक १ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयामध्ये अनुक्रमे सरासरीच्या ४०१ %, ६१८%, ७५८ %, व ४८० % इतक्या मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली. सदर अतिवृष्टीमुळे या जिल्हयांतील शहरी व ग्रामीण भागात अभुतपूर्व अशी पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. या पुरपरिस्थितीमुळे सामान्य जनजीवन मोठया प्रमाणात विस्कळीत होवून मालमत्तेचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना मदत करण्यासंदर्भात संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यास मदतीसंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३.९.२०१९ रोजी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशामध्ये काही बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना पशुधनाच्या नुकसानीकरिता सहाय्य करण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. पशुधनाच्या नुकसानीकरिता दयावयाची मदत केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना न देता याचा लाभ सर्व शेतकऱ्यांना व शेतकरी नसलेल्या सर्वांना **३ मोठे दुधाळ जनावरे किंवा ३० छोटी दुधाळ जनावरे किंवा ३ ओढकाम करणारी जनावरे किंवा ६ ओढकाम करणारी लहान जनावरे प्रतिकुटुंब** या मर्यादेत देण्यात यावा.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आलेल्या मदतीच्या तपशीलामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :

"४. शेती पिकांच्या नुकसानीसाठी मदत

बाब	*दयावयाची मदत*	*दयावयाची सुधारित मदत*
पूरग्रस्त परिस्थितीमध्ये शेतक-यांची पिके पुरामुळे नष्ट/हानी झाली आहे, त्यामुळे	**(१ अ)** ज्या शेतक-यांच्या पिकांची अतिवृष्टी व पुरामुळे किमान ५० % हानी झाली आहे अशा शेतकऱ्यांपैकी ज्यांनी नुकसान झालेल्या पीकासाठी पिक कर्ज घेतले आहे अशा शेतकऱ्यांनी ज्या बँकेकडून पिक कर्ज घेतले आहे त्या बँकेच्या पीक कर्ज दरानुसार (scale of finance) १ हेक्टरच्या मर्यादेपर्यंत (संबंधित	**(१ अ)** ज्या शेतक-यांच्या पिकांची अतिवृष्टी व पुरामुळे किमान ३३ % हानी झाली आहे अशा शेतकऱ्यांपैकी ज्यांनी नुकसान झालेल्या पीकासाठी पिक कर्ज घेतले आहे अशा शेतकऱ्यांनी ज्या बँकेकडून पिक कर्ज घेतले आहे त्या बँकेच्या पीक कर्ज दरानुसार (scale of finance) १ हेक्टरच्या मर्यादेपर्यंत (संबंधित

पुरग्रस्त शेतक-यांच्या शेतीच्या नुकसानीसाठी मदत देणे	शेतकऱ्याकडे १ हेक्टरपेक्षा जास्त कितीही शेती असली तरी) कर्ज माफी देण्यात येईल. याबाबत स्वतंत्र शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल. **कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या सदर १ हेक्टर क्षेत्रासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF)/ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) नुसार देय असलेल्या पीक नुकसानीच्या मदतीची रक्कम देय होणार नाही.** **१ (ब)** ज्या शेतकऱ्यांनी नुकसान झालेल्या पिकासाठी पीक कर्ज घेतले नाही परंतु त्यांच्या पिकांची अतिवृष्टी व पुरामुळे किमान ५०% हानी झाली आहे अशा शेतकऱ्यांना १ हेक्टरच्या मर्यादेत (संबंधित शेतकऱ्याकडे १ हेक्टरपेक्षा जास्त कितीही शेती असली तरी) दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF)/ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) नुसार त्या त्या पिकासाठी/क्षेत्रासाठी अनुज्ञेय असलेल्या मदतीच्या दराच्या तिप्पट रक्कम मदत म्हणून देण्यात यावी. २. वरील परिच्छेद क्र.१ व २ मधील शेतकऱ्यां व्यतिरिक्त ३३% - ५०% दरम्यान पिकांचे नुकसान झालेल्या इतर शेतकऱ्यांना १ हेक्टरच्या मर्यादेत (संबंधित शेतकऱ्याकडे १ हेक्टरपेक्षा जास्त कितीही शेती असली तरी) दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF)/ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) नुसार त्या त्या पिकासाठी/क्षेत्रासाठी अनुज्ञेय असलेल्या दराने मदत देण्यात यावी.	शेतकऱ्याकडे १ हेक्टरपेक्षा जास्त कितीही शेती असली तरी) कर्ज माफी देण्यात येईल. याबाबत स्वतंत्र शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल. **कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या सदर १ हेक्टर क्षेत्रासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF)/ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) नुसार देय असलेल्या पीक नुकसानीच्या मदतीची रक्कम देय होणार नाही.** **१ (ब)** ज्या शेतकऱ्यांनी नुकसान झालेल्या पिकासाठी पीक कर्ज घेतले नाही परंतु त्यांच्या पिकांची अतिवृष्टी व पुरामुळे किमान ३३ % हानी झाली आहे अशा शेतकऱ्यांना १ हेक्टरच्या मर्यादेत (संबंधित शेतकऱ्याकडे १ हेक्टरपेक्षा जास्त कितीही शेती असली तरी) दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF)/ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) नुसार त्या त्या पिकासाठी/क्षेत्रासाठी अनुज्ञेय असलेल्या मदतीच्या दराच्या तिप्पट रक्कम मदत म्हणून देण्यात यावी. २. “*वगळण्यात येत आहे.*”

३. सदर शासन निर्णय एक विशेष बाब म्हणून निर्गमित करण्यात येत असून तो जूलै - ऑगस्ट, २०१९ या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शहरी व ग्रामीण भागाकरिताच लागू राहील.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६८/२०१९/व्यय-९, दिनांक ११.९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१११८५००४२३१९ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.09.11 19:00:27 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन, मुंबई
१०. प्रधान सचिव (नवि-२),नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
११. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१८. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२१. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२२. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२३. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२४. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२५. निवड नस्ती (कार्यासन/ म-३)